# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.06.2026** **वारःशुक्रवार**

1. मुद्रांक नोंदणी प्रकरणातील गैरव्यवहारांची विशेष कृती दलाच्या माध्यमातून सखोल चौकशी होणार
2. नागपूर इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचं जीएमआर कंपनीकडे हस्तांतरण
3. नसरापूर बालिका अत्याचार आणि हत्येप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे दोषी, येत्या सोमवारी शिक्षा सुनावणार आणि
4. महिला टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा बांग्लादेशवर विजय; 'अ' गटात भारत दुसऱ्या स्थानावर

**बेकायदा दस्त नोंदणी**

नवी मुंबईतील अनधिकृत इमारतींमधील दस्तांची बेकायदा नोंदणी करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवल्या प्रकरणी दोषी अधिकाऱ्याला केवळ निलंबित न करता थेट सेवेतून बडतर्फ करण्यात येणार आहे. तसंच मुद्रांक शुल्कातील अर्धन्यायिक अधिकारांचा गैरवापर रोखण्यासाठी 1 एप्रिल 2021 ते 31 मार्च 2026 या काळातील राज्यातील सर्व प्रकरणांची महालेखापालांच्या विशेष कृती दलाच्या माध्यमातून सखोल चौकशी केली जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधानसभेत दिली. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहात हा विषय उपस्थित केला होता.

राज्यात गौणखनिज माफिया आणि वाळू तस्करी रोखण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची घोषणाही बावनकुळे यांनी केली.

कोकण विभागात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या आंबा आणि  काजू उत्पादक शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत 209 कोटी रुपयांची मदत दिली जाणार आहे, त्याचप्रमाणे हवामान आधारित पीक विमा योजनेंतर्गत केली जाणारी मदतही 15 दिवसांच्या आत दिली जाईल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

दरम्यान राज्यात अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या अडीच लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांना 334 कोटी रुपयांहून अधिक रकमेची नुकसान भरपाई देण्याचा शासन आदेश राज्य सरकारनं काल जारी केला. गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरपासून यंदाच्या मे महिन्यापर्यंत झालेल्या अवकाळी पावसानं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही आर्थिक मदत जमा होणार आहे.

**लोहगड हत्याकांड**

पुण्यात लोहगड किल्ल्यावर झालेल्या तरुणाच्या हत्येप्रकरणी विशेष तपास पथक म्हणजे SIT नेमण्याचे आदेश विधानसभा तालिका अध्यक्ष राजीव खरे यांनी राज्य सरकारला दिले आहेत. आमदार सुनील शेळके यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. काही दिवसांपूर्वी या तरुणाच्या वाग्दत्त वधुनं तिच्या प्रियकराच्या मदतीनं किल्ल्यावरून ढकलून त्याची हत्या केली होती.

**विधानपरिषद लक्षवेधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये मिथेनॉलमिश्रित दारू पिऊन 22 जणांचा मृत्यू झाला होता; या प्रकरणात सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही, आरोपींवर शक्य असेल तर संघटित गुन्हेगारीसाठीचा मकोका लावू आणि कडक कारवाई

करू, असं आश्वासन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी काल विधानपरिषदेत दिलं. अमित गोरखे यांनी याबाबतची लक्षवेधी सूचना मांडली. अटक केलेल्यांव्यतिरिक्तही जर कुणी दोषी असतील, तर त्यांच्यावरही कारवाई करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. मृतांच्या कुटुंबियांना सरकारने जाहीर केलेली मदत लवकरात लवकर त्यांच्यापर्यंत पोहोचेल, असंही कदम यांनी सांगितलं.

**नागपूर-विमानतळ-हस्तांतरण**

नागपूर इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचं जीएमआर या खाजगी कंपनीकडे काल औपचारिक हस्तांतरण करण्यात आलं. नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. गेल्या दशकात विमानतळाची प्रवासी क्षमता 10 लाखांनी वाढली असून, जीएमआरच्या माध्यमातून ती दरवर्षी 60 लाखांहून अधिक होण्याची अपेक्षा असल्याचं, केंद्रीय मंत्री नायडू यांनी यावेळी सांगितलं. यावेळी बोलताना नायडू म्हणाले...

**एयरपोर्ट की पूरी ताकत को हम इकोनॉमिक एक्टिविटी से जोड़ेंगे एयरपोर्ट के चारों और इंडस्ट्री को लेके आएंगे इट हो सकता है, मैन्युफैक्चरिंग हो सकता है, एग्रीकल्चर हो सकता है, कल्चर से रिलेटेड टूरिज्म से रिलेटेड जब एयरपोर्ट की पूरी क्षमता को हम पूरा अनलॉक जब करेंगे तो एयरोट्रोपोलिस का आईडीईए विकसित होता है। विदर्भ के विकास के लिए नए द्वार खोले हैं ये हम सबको समझना पड़ेगा।**

विदर्भातील पर्यटन, खाणकाम आणि उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी या विमानतळाचं महत्त्व केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी अधोरेखित केलं. नागपूर विमानतळ हे केवळ शहरासाठी नव्हे तर संपूर्ण विदर्भ आणि मध्य भारतासाठी 'ग्रोथ इंजिन' ठरेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**संरक्षण-आत्मनिर्भरता**

महाराष्ट्राला 1 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं लक्ष्य गाठण्यासाठी संरक्षण उत्पादन क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असं प्रतिपादन पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शुभम गुप्ता यांनी काल पुण्यात केलं. राज्यात संरक्षण उत्पादन उद्योगाला चालना देत नवसंशोधन, संशोधन आणि स्वदेशीकरणाला प्रोत्साहन देण्यावर भर दिला जात आहे, यामुळे देशाच्या संरक्षण क्षमतेत वाढ होण्याबरोबरच राज्यातील उद्योग, उद्योजक आणि स्टार्टअप्ससाठी नवीन संधी उपलब्ध होत आहेत असं गुप्ता यांनी सांगितलं. संरक्षण उत्पादन विभागाच्या वतीनं 'संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरता' या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील विभागीय शिखर परिषदेत गुप्ता बोलत होते. या परिषदेला पुणे विभागातील संरक्षण क्षेत्राशी संबंधित उद्योग आणि इतर भागधारक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**नसरापुर अत्याचार-सुनावणी**

नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याला पुणे जिल्हा सत्र न्यायालयाने दोषी ठरवले असून, शिक्षेची घोषणा 29 जून रोजी करण्यात येणार आहे. ज्या ज्या कलमांखाली खटला चालला ते सर्व गुन्हे सिद्ध झाले आहेत. त्यापैकी दोन गुन्ह्यांमध्ये फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. एका गुन्ह्यात आजन्म जन्मठेपेची तर एका गुन्ह्यात 14 वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे. या प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसतानाही, विविध पुराव्यांच्या आधारे 21 मेपासून दैनंदिन सुनावणी झाल्यानंतर अवघ्या 55 दिवसांत अंतिम निर्णयाच्या टप्प्यापर्यंत पोहोचलेला हा राज्याच्या न्यायालयीन इतिहासातील अत्यंत वेगानं चाललेला खटला मानला जात आहे.

**संविधान हत्या**

संविधान हत्या दिनानिमित्त काल राज्यात विविध ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. आणीबाणीच्या काळात देशासाठी प्राण गमावलेल्या व्यक्तींना नाशिक आणि रत्नागिरीमध्ये श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. तसंच आणीबाणीत तुरूंगवास भोगलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.

**गो-संवाद यात्रा- नाशिक**

पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र गो सेवा आयोगातर्फे आयोजित करण्यात आलेली 'राज्यमाता गोसंवाद यात्रा' काल नाशिक शहरात दाखल झाली. राज्य शासनाच्या माध्यमातून गोमातेच्या संवर्धनासाठी अनुदान दिले जाते. ज्या शेतकऱ्यांना गायींचा सांभाळ करणे आर्थिकदृष्ट्या शक्य नसेल, त्यांनी अशा गायी गोशाळेला द्याव्यात, त्याचा योग्य तो मोबदला शेतकऱ्यांना दिला जाईल, अशी माहिती  गोमाता आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली.

**सायकलरॅली-सांगली**

मादक पदार्थ गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त सांगलीत विद्यार्थ्यांनी काल सायकल रॅली काढून व्यसनमुक्तीचा संदेश दिला. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थित नागरिकांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली.

**पेढाविक्री-धाड-अहिल्यानगर**

अहमदनगर जिल्ह्यात शिर्डी इथं श्री साईबाबा मंदिर परिसरात खासगी पेढा विक्री केंद्रे आणि पेढा उत्पादन करणाऱ्या आस्थापनांवर धाड टाकून अन्न आणि औषध प्रशासन विभागानं 600 किलोहून अधिक निकृष्ट दर्जाचे पेढे जप्त केले. या पेढ्याची किंमत जवळपास दोन लाख रुपये आहे, 15 दिवसांतली ही दुसरी मोठी कारवाई आहे.

**निकृष्ट सुपारी-नांदेड**

नांदेड जिल्ह्यात अर्धापूर तालुक्यातील पार्डी टोल नाका इथं अन्न आणि औषध प्रशासनानं सुमारे 29 हजार किलो निकृष्ट दर्जाच्या सुपारीचा साठा जप्त केला आहे. त्याची किंमत 86 लाखांहून जास्त आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.

**महिला- टी-20**

महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'अ' गटाच्या सामन्यात भारताने बांगलादेशचा पाच खेळाडू राखून पराभव केला. इंग्लंडमधील मँचेस्टर इथे  काल रात्री झालेल्या या सामन्यात बांग्लादेश संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला; आणि निर्धारित 20 षटकांत 136 धावा केल्या. भारताने 5 खेळाडू गमावत, हे लक्ष्य सतराव्या षटकातच पूर्ण केलं. शेफाली वर्माने 34 चेंडूंत 53 धावा केल्या. तिला 'सामनावीर' घोषित करण्यात आलं. या विजयानंतर सहा गुणांसह भारत 'अ' गटामध्ये दुसऱ्या स्थानावर आहे.

**पाऊस**

मोसमी पावसानं राज्याच्या बहुतांश भागात हजेरी लावली आहे. जालना आणि बुलडाणा जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे खरीप हंगामातील पेरण्यांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. रत्नागिरीमध्ये काल दुपारनंतर पावसानं उसंत घेतली आहे. पुणे आणि कोल्हापूरमध्येही काल पावसाने विश्रांती घेतली.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे, विदर्भातही काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**